निर्वाह भत्याचे पूर्नविलोकन करणे बाबत.
श्री.वीर बापुसाहेब मारुती सेवा निलंबीत सहाय्यक
पशुधन विकास अधिकारी पशुवैदयकीय दवाखाना
कोरडगांव ता.पाथर्डी पं.स पाथर्डी

अहिल्यानगर जिल्हा परिषद
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक पसं/आस्था-१/६८०/२०२६
दिनांक स्वाक्षरी खाली नमुद केल्याप्रमाणे

संदर्भ १. इकडील निलंबन आदेश जि प जा.क्र.पसं/आस्था-१/२४२/२०२६ दि.०६/०५/२०२६

२. इकडील शुध्दीपत्रक जा.क्र.पसं/आस्था-१/३४५/२०२६ दिनांक ०३/०६/२०२६

३. गट विकास अधिकारी पं.स.पाथर्डी यांचेकडील पत्र जा.क्र.कार्या-१/आस्था-१/८२२/२०२६ दिनांक ०६/०८/२०२६

४. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १०/१२/१९८१

५. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे हया काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ६८ (१)

श्री. वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पशुवैदयकीय दवाखाना कोरडगांव ता.पाथर्डी पंचायत समिती पाथर्डी येथे कार्यरत असताना कर्तव्यात कसुन केल्याने संदर्भ क्र.०१ अन्वये, त्यांना जिल्हा परिषद सेवेतुन निलंबीत करणेत आले होते. श्री. वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांचा सेवानिलंबन कालावधी ३ महिन्यापेक्षा जास्त झालेला आहे. श्री. वीर सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांचे विरुध्द दोषारोप पत्र बजावणे प्रस्तावित आहे.

श्री. वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकारी हे त्यांचा सेवानिलंबन कालावधी वाढविल्यास जबाबदार नसल्याचे निष्पन्न होत असल्याने, मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर संदर्भ-४ च्या तरतुदीस अधिन राहुन मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री. वीर बापुसाहेब मारुती सेवा निलंबित सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांना पहिल्या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये अनुज्ञेय असलेला निर्वाह भत्याच्या पन्नास टक्के इतक्या मर्यादेपर्यंत निर्वाह भत्ता वाढविण्यास मंजुरी देत आहे. तसेच संदर्भ क्रमांक ०१ अन्वये श्री.वीर बापुसाहेब मारुती सेवा निलंबित सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांना सेवानिलंबित करण्यात आलेल्या आदेशातील अटी व शर्तीची काटेकोर पालन करणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

सदर आदेशाची श्री. वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांच्या मूळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 20261104110037 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 14:02:18
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. वीर बापुसाहेब मारुती सहाय्यक पशुधन विकास अधिकारी

व्दारा व प्रत :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती पाथर्डी

२/- सदरचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अहवाल सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी/पारनेर

प्रत :- तालुका पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय अधिकारी पंचायत समिती पाथर्डी/पारनेर दवाखाना

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर